१

Page No. Date

श्रीराम

ध्यानी मनी वसतो राम
मुखी सदैव तयाचे नाम ---
श्रध्दा भक्ती प्रभुश्रीरामावर
भाव निस्सिम अर्पिला तर
सार्थक जीवनाचे होणार खरोखर
चरणकमलाशी प्रभुपदाच्या मिळे खरा विश्राम
ध्यानी मनी वसतो राम
मुखी सदैव तयाचे नाम ---॥१॥
भिस्त श्रीरामप्रभुवर टाकुनी सारी
संचित सुखदुःखाचे अनुभवला संसारी
तारतसे "सीताराम" भक्तास वरचेवरी
कृपासिंधू पुरुषोत्तम हेच खरे सुखधाम
ध्यानी मनी वसतो राम
मुखी सदैव तयाचे नाम ----॥२॥
रामानंदी तल्लीन होता, अर्थ उमगती नवे नवे
कवच रामरक्षेचे म्हणुनी सदैव जवळी हवे
एकमुखाने गजर करण्या, टाळमृदंगा सवे
तल्लीन होवूनी म्हणूया श्रीराम जय राम जयजय राम
ध्यानी मनी वसतो राम
मुखी सदैव तयाचे नाम !! ----॥३॥



सौ. विजया पुरुषोत्तम जोशी

